# दिव्यांग विद्यार्थ्यांनी विकासामध्ये हातभार लावावा

## – डॉ. राजेंद्र हिरेमठ

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

दिव्यांग विद्यार्थ्यांनी चांगले नागरिक म्हणून देशाच्या आणि समाजाच्या विकासामध्ये हातभार लावावा. त्यामुळे त्यांनी अशा प्रकारे आपले जीवनमान उंचावण्यासाठी कटिबद्ध व्हावे, असे प्रतिपादन डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यूजीसी स्किम्स फॉर पर्सन्स वीथ डिस ॲबिलिटीज या विभागामार्फत 'उच्च शिक्षण आणि सर्वसमावेशक पद्धतींमध्ये दिव्यांग लोकांची प्रवेश योग्यता' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले होते. त्यावेळी पुणे येथील सिनर्जी इफ्रासिस मॅनेजमेंट प्रा.लि.चे अध्यक्ष डॉ. हिरेमठ प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. हिरेमठ म्हणाले, उच्च शिक्षणामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प आहे. ते वाढविण्यासाठी शिक्षणाबरोबरच आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत असणारी संस्था म्हणून शिवाजी विद्यापीठाकडे पाहिले जाते. मागील काही वर्षांपासून दिव्यांगांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन सकारात्मक झालेला आहे. समाजाने दिव्यांगांप्रती सहानुभूती दर्शविण्यापेक्षा त्यांचे समर्थन करावे, त्यांना साथ द्यावी. विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची क्षमता वाढविल्यास रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. आपल्यामधील कमतरताना न कुरवाळता त्यावर मात करून पुढे येणाऱ्या आव्हानांना सामोरे गेले पाहिजे. समाजासाठी, देशासाठी काम करण्याची जिद्द आणि ऊर्जा आपल्यामध्ये निर्माण केली पाहिजे.



**कोल्हापूर : राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत अन्य मान्यवर.**

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, दिव्यांग विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात सामील होणे आवश्यक आहे. कोणत्याही अडथळ्यामुळे मागे राहू नये. शैक्षणिक पात्रता वाढवून आधुनिक तंत्रज्ञानातील कौशल्ये आत्मसात केल्यास रोजगाराची संधी उपलब्ध होईल. यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. विभागाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन लिटॉन प्रसाद यांनी केले, तर वनस्पतिशास्त्र विभागाच्या डॉ. कल्याणी पवार यांनी आभार मानले. यावेळी दिव्यांग विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय कर्मचारी व अधिकारी उपस्थित होते.

# विद्यापीठात राज्यस्तरीय योग, निसर्गोपचार परिषद उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने व निसर्गोपचार दिवसाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषद शनिवारी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भाषा भवनात सकाळी १० ते ६ या वेळेत झाली. परिषदेचे उद्घाटन राज्य पोलीस दलाच्या गुप्तचर विभागातील स्वेच्छानिवृत्त अधिकारी व जागतिक कीर्तीचे योगसद्गुरू डॉ. कृष्णदेव गिरी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

कार्यक्रमाची सुरुवात शंखनाद व निसर्गगीत सादर करून करण्यात आली.



यावेळी बोलताना कृष्णदेव गिरी म्हणाले, ध्यान, प्राणायाम याचे माणसाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी जीवन सर्वांगसुंदर करण्यासाठी योगाचा प्रचार प्रसार व्हावा.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशा परिषदा गरजेच्या आहेत. शिवाजी विद्यापीठ नेहमीच अशा उपक्रमात अग्रेसर असते. या राज्यस्तरीय योग व निसर्गोपचार परिषदेत योग व निसर्गोपचार,

▶▶ पान २ वर

# विद्यापीठात राज्यस्तरीय योग...

आहारशास्त्र, ॲक्युप्रेशर अशा विविध विषयांवर डॉ. कृष्णदेव गिरी, डॉ. अश्विनी देशमुख, डॉ. अर्चना त्रिवेदी यांची व्याख्याने झाली. यावेळी सुमारे १८ मान्यवरांनी स्वतःचे योग व निसर्गोपचारमधील विविध विषयांवर पेपर सादर केले. कार्यक्रमास कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, मुंबईचे आजीवन अध्ययन विभागप्रमुख डॉ. दिलीप पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन नीता एरगोळे, सुमेधा सरदेसाई व डॉ. श्वेतलिना पाटील यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. सुमन बुवा यांनी केले.

# महर्षी दयानंद विद्यापीठाला विजेतेपद

स्थानिक क्रीडा वृत्त



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी- २०' क्रिकेटचे विजेतेपद पटकावणारा महर्षी दयानंद विद्यापीठ संघ.

कोल्हापूर, ता.३० : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कर्मचारी 'कुलगुरू चषक टी- २०' क्रिकेट स्पर्धेत महर्षी दयानंद विद्यापीठ संघाने (रोहटक) विजेतेपद पटकावले. सामन्यात रोहटक विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. या मध्ये निर्धारित २० षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात १४१ धावा केल्या. यामध्ये गौरव याने ४९, नरेंद्र कुमार याने ४२ धावा केल्या. पंजाबी विद्यापीठ पटियाला संघाकडून जसबीर सिंग आणि प्रीतपाल सिंग यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

उत्तरादाखल खेळताना पटियाला संघाचा दयानंद विद्यापीठाच्या गोलंदाजांसमोर निभाव लागला नाही. १९.२ षटकांत सर्वगडी बाद १२२ धावाच करता आल्या. यामध्ये जसबीर सिंग याच्या २९ आणि दीपक सिंग याच्या २४ धावांचा समावेश आहे.

'दयानंद'कडून दीपक कुमार याने ३ तर पंकज नैन आणि ऋषी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. सामनावीर म्हणून 'दयानंद'च्या दीपक कुमार याला गौरवण्यात आले.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या सामन्यात लाला लजपतराय विद्यापीठ (हिसार) संघाने जम्मू विद्यापीठ जम्मू संघावर ४ गडी राखून विजय मिळवला. या सामन्यांमध्ये जम्मू विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करताना निर्धारित २० षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात १८० धावा केल्या. उत्तरादाखल खेळताना लाला लजपतराय विद्यापीठ (हिसार) संघाने हे आव्हान १७.३ षटकात ६ गड्यांच्या मोबदल्यात पूर्ण केले. या मध्ये हिसार संघाने १८४ धावा केल्या. सामनावीर म्हणून प्रवीण संगवान याला गौरवण्यात आले.